# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५७** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- ३३२** **दिनांक :-१३/११/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.२९/१०/२०२५ बुधवार रोजी सकाळी ११.३० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.५६ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.२९/१०/२०२५ बुधवार रोजी सकाळी ११.३० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.५६ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.२९/१०/२०२५ बुधवार रोजी सकाळी ११.३० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.५६ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५७** **(स्थायी समिती)**

---

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:-३३३** **दिनांक :-१३/११/२०२५**

**वाचा** :-

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक आयुक्त, वाहन विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/९५/२०२५-२६ दि.१३/११/२०२५

३. सहाय्यक आयुक्त,वाहन विभाग यांचा दि.१०/११/२०२५ चा अभिप्राय

४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.१०/११/२०२५ चा अभिप्राय

५. उपायुक्त यांचा दि.१०/११/२०२५ चा अभिप्राय

६. आयुक्त यांचा दि.११/११/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, वाहन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

पंप ऑपरेटर यांच्या दि.०६/११/२०२५ चे रिपोर्टनूसार म.न.पा. वाहनांसाठी डिझेलसाठा ४२३० लिटर शिल्लक असुन लागणारा शिल्लक डिझेल साठानुसार ५ ते ६ दिवसांसाठी पुरवठा होईल. सबब पंप ऑपरेटर यांनी मागणी क्रं.१४१२० दि.०६/११/२०२५ अन्वये १२००० लिटर डिझेलची मागणी केलेली आहे.

दि.०९/०७/२०२२ पासून डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दरात (रेट) फरक असल्याने मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडुन दि.०८/०७/२०२२ पासून किरकोळ डिझेल खरेदी महासभा/स्थायी समितीच्या मान्यतेने सुरु आहे. किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजार भाव) व बल्क दर या दोघामध्ये जो पर्यंत फरक राहील तो पर्यंत बाजार भावातून किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव यांचे दर प्रति लिटर एकुण रक्कम रु.९२.०३ मात्र आहेत.

महासभा ठराव क्रं.१२७० दि.२३/०८/२०२३ अन्वये तसेच स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे १२००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता किरकोळ डिझेल खरेदी करण्यात येत आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार दि.१४/१०/२०२५ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन म.न.पा. वाहनांसाठी डिझेल घेणे सोईचे होईल.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात १२००० लिटर डिझेल खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२५-२६/२२ दि.०६/११/२०२५ अन्वये रक्कम रु.११,०४,३६०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार स्थायी समिती/प्रशासक यांच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन निविदा न मागविता मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्या कडुन १२००० लिटर किरकोळ डिझेल खरेदी करणेस व या कामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास स्थायी समिती / प्रशासक यांची मान्यता मिळण्यासाठी वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.५७** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:-३३४** **दिनांक :-१३/११/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./सार्व.बांधकाम विभाग/८९०/२०२५-२६ दि.१३/११/२०२५

३. निविदा समितीचा निर्णय.

**विषय :-** मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र. ०१ राजमालती नगर स.नं. ३११/२/३ व स.न.३२०/१ ब रोड डांबरीकरण करणे.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ व ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र. ०१ राजमालती नगर स.नं. ३११/२/३ व स.न.३२०/१ ब रोड डांबरीकरण करणे. प्रशासक ठराव क्र. २५० दि. १२/०३/२०२५ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली व सदर कामास आयुक्त यांचे दि. ०६/०२/२०२५ च्या मान्यते अन्वये जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करण्यास मान्यता दिली त्यानुसार सदर कामाची जाहीर ई-निविदा सुचना क्र ५९१ सा.बा./जा.क्र./२१२२ दि.२०/०३/२०२५चे पत्रान्वये दै. नवभारत या वर्तमान पत्रात दि. २१/०३/२०२५ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाद्वारे निविदा भरणेकरीता दि. २०/०३/२०२५ ते दि. २७/०३/२०२५ पर्यत मुदत देण्यात आली होती. मुदतीत संगणाकाद्वारे https://mahatenders.in वर दिलेल्या मुदतीत ०४ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. सदरचे आलेले बंद पाकीटापैकी लिफाफा नं. ०१ शहर अभियंता यांचे समक्ष उघडले असुन त्याची विस्तृत छाननी केली असता अ.क्र.०१ चे मक्तेदार श्री. सचिन प्रकाश पाटील यांना दि. ११/०७/२०२५ रोजी शॉट फॉल देण्यात आला त्यात As Per Tender Required १ Value B Bid Capacity goes to negative and not Surricient सादर करणे बाबत दि. १४/०७/२०२५ पर्यंत कागदपत्र सादर केलेली नाही म्हणुन ते अपात्र ठरत आहे. व अ.नं. ०२ चे मक्तेदार श्री राजकिरण नरेंद्र चौधरी यांना दि. ११/०७/२०२५ रोजी शॉट फॉल देण्यात आला त्यात As per Tender Required १ Bitumen Machinery detall not found सादर करणे बाबत दि. १४/०७/२०२५ पर्यंत कागदपत्र सादर केलेली नाही म्हणुन ते अपात्र ठरत आहे. तरी सदर कामाची दुसरी फेर निविदा सुचना निविदा निर्णय समितीच्या च्या मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्र. ६२३ मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असता ई-निविदा सुचना मनपा सा.बा./जा.क्र./६३७ दि. ०४/०९/२०२५ चे पत्रान्वये दि. ०५/०९/२०२५ चे दै. सामना या वर्तमान पत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता ई-निविदा मनपा संकेत स्थळावर https://mahatenders.in भरणे कामी दि. ०४/०९/२०२५ ते दि. ११/०९/२०२५ पर्यंत मुदत देण्यात आली असता मुदतीत ०२ ई-निविदा मनपा संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. सदर कामाचे ई-निविदाचे संगणकावर कागदपत्रे फोल्डर नं. ०१ उघडण्यास व आलेले ई-निविदा कागद पत्राची छाननी लिपीक , संबंधीत शाख अभियंता व पवडी उपलेखापाल यांचे कडुन करण्यात आलेली असुन त्यात श्री. गौरव प्रल्हाद चौधरी यांना बीड कॅपेसिटी बाबतची कागदपत्रे सादर करणे बाबत दि. ३०/०९/२०२५ शॉट फॉल देण्यात आला त्या नुसार त्यांनी दि. ०३/१०/२०२५ रोजी पर्यत सिमिलर टाईप ऑफ वर्क सादर केलेली नाही म्हणुन ते अपात्र ठरत आहे. त्या अनुषंगाने गोषवारा खालील प्रमाणे. परंतु (१)शासन निर्णय CAT/२०१७ प्र.क्र.०८/इ.मा.०२/मंत्रालय , मुंबई दि. २७/०९/२०१८ व (२) शासन निर्णय CAT २०१७ /प्र.क्र.८/इमा-२ दि. २०/०५/२०१९ चे शासन निर्णया नुसार (३) शासन निर्णय संकीर्ण २०२१/प्र.क्र.९८/ नवि-१६ दिनांक ०८ जुलै २०२१ अन्वये प्राप्त झालेल्या निविदा स्विकारण्यास निविदा समितीने मान्यता दिल्या नुसार एक निविदाधारक पात्र असल्याने एक निविदाधारक यांचे निविदा दराबाबतचे पाकीट क्र. ०२ उघडले असता त्यात आलेल्या दराबाबतचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु ३२,९७,८२९/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री. निलेश सुरेश पाटील | निविदारक्कमेइतकेवर ३.१००% जास्तीचे दराने | ३४,००,०६१/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री. निलेश सुरेश पाटील , जळगांव यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ३.१००% जास्तचे दर आलेले आहे. त्या नुसार त्यांना वाटाघाटी इकडील पत्र क्र./सा.बा/जा.क्र./ ८२२ दिनांक १७/१०/२०२५ चे पत्रानुसार त्यांना दि. २७/१०/२०२५ रोजी बोलाविले असता त्यांनी दि. २७/१०/२०२५ चे पत्रानुसार अंदाजीत रक्कमेतच काम करण्याची लेखी संमती दर्शविली आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु ३२,९७,८२९/-मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, रॉयलटी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहेत.

| अ.नं. | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ३२,९७,८२९ |
|---|---|---|
| १ | जि.एस.टी.१८% | ५,९३,६०९/- |
| २ | कामगार विमा ०.५% | १६४८९/- |
| ३ | रॉयल्टी | १,०९,५०६/- |
| ४ | टेस्टींग चार्जेस | ८८७०/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ४०,२६,३०३/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु ४०,२६,३०३/- मात्र आहे. मात्र सदरचा खर्च नविन रस्ते या लेखशिर्षका खाली मंजुर झाले असल्याने सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार श्री. निलेश सुरेश पाटील , जळगांव यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**